# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 22.12.2025 वार- सोमवार

---

**महापालिका तयारी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणूकीसाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यात येत आहेत. या निवडणुकीसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे, त्यानुसार जवळपास बारा हजार जणांची नियुक्ती करण्यात येत असून महापालिकेच्या वतीने त्यांना प्रशिक्षण दिलं जात आहे.

**पुणेमनपा**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत राजकीय पक्ष आणि उमेदवारांना प्रचार सभांसाठी महापालिकेची मैदाने, शाळांची मैदाने, मोकळी जागा तसंच चौकांचा वापर करता येईल. यासाठी महापालिका प्रशासनाने अटी आणि शर्तींची नियमावली आणि दरपत्रक जाहीर केलं आहे. प्रचारादरम्यान रस्ते किंवा पदपथावर खड्डे केल्यास किंवा नुकसान झाल्यास दंड आकारला जाणार आहे. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या सर्व आचारसंहितांचं पालन करणं बंधनकारक असेल. असं प्रशासनाने स्पष्ट केलं आहे.

**राष्ट्रवादीला पाठींबा**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल डंबाळे यांची आज सकाळी बारामती गेस्ट हाऊस इथं बैठक झाली.

**साखरकारखाना**

राज्यातील साखर कारखान्यांनी गाळप केलेल्या उसाची एफआरपी 14 दिवसांत शेतकऱ्यांना देणं बंधनकारक आहे. 14 दिवसांच्या कालावधीत कारखान्यांनी एफआरपी देयकं दिली नाहीत, तर विलंब कालावधीसाठी 15 टक्के व्याजासह ऊस बिलं द्यावी लागतील, अशा सूचना साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी सर्व साखर कारखान्यांना दिल्या आहेत. राज्यातल्या 163 साखर कारखान्यांनी ऊस गाळप केलं आहे. त्यातल्या 34 साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची देयकं वेळेत दिली आहेत, 129 साखर कारखान्यांकडे अजूनही ऊसबिल थकीत आहे.

**लवासा**

पुण्याजवळच्या लवासा प्रकल्पाला कथित बेकायदेशीर परवानग्या दिल्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या सीबीआय चौकशीची मागणी करणारी 2023 सालची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. पोलिसांनी याबाबतीत एफआयआर दाखल करावा असा आदेश न्यायालयाने देण्यासाठी कायद्यात तरतूद नसल्यामुळे ही याचिका फेटाळल्याचं उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम आंखड यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे.

**घरकुल लोकार्पण**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भोर तालुक्यातील वडगाव डाळ इथं पंतप्रधान जनमन आवास योजनेअंतर्गत घरकुल प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा आज झाला. या घरकुल प्रकल्पाच्या माध्यमातून आदिवासी कातकरी समाजातील अनेक

कुटुंबांचं स्वतःच्या घराचं स्वप्न पूर्ण झालं आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी  गजानन पाटील, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. हा प्रकल्प बिबवेवाडी रोटरी क्लब आणि परमनिश्चय फाउंडेशनच्या सहकार्याने उभारण्यात आला आहे.

**कर्करोग**

सिंगापूरमध्ये 5 ते 7 डिसेंबर या कालावधीत झालेल्या 'एस्मो एशिया काँग्रेस 2025' या जागतिक कर्करोग परिषदेत पुण्यातील रसायु कॅन्सर क्लिनिकमध्ये झालेलं संशोधन सादर करण्यात आलं. अन्य आवश्यक उपचारांबरोबरच आयुर्वेदिक रसायन थेरपी, स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांचं जीवनमान लक्षणीयरीत्या सुधारू शकते, हे रसायू क्लिनिकने केलेल्या अभ्यासात आढळलं आहे. असं रसायुचे वैद्यकीय संचालक डॉ. योगेश बेंडाळे यांनी सांगितलं.

**दख्खन**

दख्खन इतिहास संशोधन संस्थेचं उद्घाटन काल पुण्यातल्या सरसेनापती वीर बाजी पासलकर सभागृहात संतसाहित्याचे अभ्यासक, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झालं. महाराष्ट्राचा इतिहास हा सर्व जातीधर्मांचा आहे, आपल्या पूर्वजांचा इतिहास जपताना भाषेचं महत्त्वदेखील लक्षात घेतलं  पाहिजे असं प्रतिपादन मोरे यांनी यावेळी केलं.

**पुरस्कार**

महाराष्ट्र विकास केंद्र या सेवाभावी संस्थेच्या वतीनं दिला जाणारा “जलमित्र” पुरस्कार, आंतरराष्ट्रीय जलाशय संवर्धन समितीचे अध्यक्ष आणि भुवनेश्वरच्या चिलिका विकास प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अजित पटनाईक यांना प्रदान करण्यात येणार आहे. आमदार दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते येत्या 24 डिसेंबर रोजी पुण्यात हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

**बाबाआढाव**

स्वच्छ सेवा सहकारी संस्था आणि कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत संघटनेतील आठशेहून अधिक कचरा वेचकांची निर्धार सभा काल पार पडली. या सभेत दिवंगत सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर बाबा आढाव यांना आदरांजली वाहण्यात आली.

**बुद्धिबळ स्पर्धा**

All Marathi Chess Association for the Visually Challenged या संस्थेनं आळंदीमध्ये दृष्टीबाधितांसाठी बुद्धिबळ स्पर्धा नुकत्याच आयोजित केल्या होत्या. कनिष्ठ गट आणि महिला  अशा दोन गटात या  स्पर्धा झाल्या. महिला गटात पश्चिम बंगाल मधील मेघा चक्रवर्ती विजेती ठरली तर कनिष्ठ गटात महाराष्ट्रातील वेद नीरज फौर याने विजेतेपद पटकावलं.

**हॉकी**

पिंपरीतील ध्यानचंद मैदानावर पार पडलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मृती चषक हॉकी स्पर्धेत प्राप्ती कर संघाने अजिंक्यपद पटकावलं. प्राप्ती कर संघाने क्रीडा प्रबोधिनी संघाचा 4-2 अशा फरकाने पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात थंडीचा कडाका कायम आहे. सकाळच्या कडक्याच्या थंडीबरोबरच आज दिवसभरही गारठा जाणवत आहे, आज पुण्यात 8 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. उद्या किमान तापमान 9 अंशाच्या आसपास राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता. ताज्या पुणे वृत्तांतसह नमस्कार.**